# पावसाळ्याच्या तोंडावर 'मेट्रो-३'च्या कामाला गती

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या ३३ किलोमीटर भुयारी मेट्रो मार्गाचे काम दिवसागणिक गती पकडत असून, आतापर्यंत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने स्टील, काँक्रिट आणि न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीने बऱ्यापैकी कामाचा आवाका घेतला केला आहे. विशेषतः न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीने मेट्रोच्या कामाला गती देण्याचा प्रयत्न कॉर्पोरेशनकडून केला गेला आहे. पावसाळ्यात मेट्रोच्या कामामुळे मुंबईकरांना अडचण येणार नाही; याची खबरदारी घेणार असल्याचेही कॉर्पोरेशनने म्हटले आहे.